# BELIEVERS EASTERN CHURCH

Office of metropolitan, Synod Secretariat, St. Thomas Community, Thiruvalla, Kerala, India.

## मेंढपाळाचे पत्र

November-December/2023

सर्व आर्चबिशप आणि बिशपजन, याजक, डीकन फादर, इव्हँजेलिस्ट, ऑर्डर ऑफ सिस्टर्स आणि विश्वव्यापी बिलीव्हर्स ईस्टर्न चर्चच्या सर्व विश्वासूंना, पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने आशीर्वाद आणि शुभेच्छा. आमेन!✠

ख्रिस्तामध्ये परम प्रियांनो,
नोव्हेंबरचा शेवट जवळ येत असताना आणि डिसेंबरच्या स्वागताची तयारी करत असताना, या दोन महिन्यांच्या महत्त्वाची आठवण करून देणे महत्त्वाचे आहे. नोव्हेंबर हा नवीन धार्मिक वर्षाच्या सुरूवातीचा प्रतीक आहे, तर डिसेंबर हा एक असा काळ आहे ज्यामध्ये आपण धार्मिक दिनदर्शिकेतील सर्वात महत्त्वाच्या घटनांपैकी एक साजरी करतो: ख्रिस्ताचा जन्म (नाताळ).

आमच्यासाठी, देवाचे लोक म्हणून, आमचे जीवन सामान्य दिनदर्शिकेपेक्षा चर्चच्या दिनदर्शिके सभोवती फिरते. या नवीन धार्मिक वर्षात ख्रिस्तामध्ये आपले जीवन वाढवण्यासाठी आपण स्वतःला समर्पित करणे महत्त्वाचे आहे. आपल्यापैकी काहींना दररोज बायबलचे वाचन करणे, कुटुंब म्हणून प्रार्थना करणे, दररोज पश्चात्ताप करणे, प्रभुला दशमांश देणे, चर्च कॅलेंडर आणि त्याचे कार्यक्रम पाळणे, इतरांची काळजी घेणे इत्यादी शिस्त विकसित करण्याची आवश्यकता असू शकते आणि अशा प्रकारची यादी पुढे जाऊ शकते.

मी तुम्हाला या अध्यात्मिक गोष्टींशी विश्वासूपणे वचनबद्ध राहण्यास आणि त्यांना तुमच्या जीवनाचा एक भाग बनवण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतो. या सर्वांची गुरुकिल्ली म्हणजे चर्च कॅलेंडरचे विश्वासूपणे पालन करणे होय, जे तुमच्यासाठी हे खूप सोपे करेल. कॅलेंडरमध्ये चर्चने जाणूनबुजून तुमच्या आध्यात्मिक जीवनाला आकार देण्यासाठी तयार केलेले सर्व उपवास आणि सण समाविष्ट आहेत. चर्च कॅलेंडर अशा प्रकारे आयोजित केले जाते की आपल्या प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे स्मरण करुन देते, ज्याची सुरुवात घोषणांच्या काळापासून होते, ज्याचे मुख्य वैशिष्ट्य नाताळ हा सण आहे.

नाताळ आशा, शांती आणि आनंदाचा भारी संदेश देतो. हे आपल्याला देवाचे प्रेम आणि तारणाच्या अफाट कार्याचे चिंतन करण्यास मदत करते. जन्माच्या रात्री मेंढपाळांना देवदूताने दिलेली घोषणा ही भावनेला उत्तम प्रकारे पकडते: "मी तुमच्यासाठी खूप आनंदाची बातमी आणत आहे जी सर्व लोकांसाठी असेल. की आज दाविदाचे शहर

बेथलेहेमामध्ये, एक तारणारा जन्माला आहे आणि तो ख्रिस्त प्रभु आहे!" (संत लूक २:१०-११) देवदूताने घोषित केल्याप्रमाणे, ही वार्ता आपल्यासह सर्वांसाठी आहे आणि ती आपली हृदय आनंदाने आणि आशेने भरते. देवाने आपल्या मानवी इतिहासात प्रवेश केला आहे आणि तो इमॅन्युएल बनला आहे, म्हणजेच देव आपल्याबरोबर आहे, जसे वचनात म्हणटले आहे, "शब्द देह झाला आणि आपल्या मध्ये वस्ती केली." (संत योहान १:१४) देवदूत, ज्योतिषी आणि मेंढपाळांनी ख्रिस्ताच्या जन्माची सुवार्ता स्वतःजवळ ठेवली नाही, तर त्यांनी सत्य आणि त्यांचे अनुभव इतरांना सांगितले. या नाताळाच्या काळात, नाताळाचा आनंद आणि उत्सव आमच्या पॅरिश, घरे आणि आमच्या हृदयाच्या भिंतींच्या पलीकडे पसरू द्या आणि ज्या समुदायाचा आम्ही एक भाग आहोत त्या समुदायामध्ये पसरू द्या.

नाताळाच्या दिवसापर्यंत, जगभरातील ऑर्थोडॉक्स लोक ख्रिस्त जन्म किंवा नाताळ उपवासाचे पालन करतात - एक असा कालावधी जो आपल्याला देवाच्या पुत्राच्या आश्चर्यकारक चमत्कारावर प्रार्थनापूर्वक विचार करण्यास मदत करते, जो देह्धारी हऊन आपल्यापैकी एक बनला जातो. या उपवासा दरम्यान, आपण स्वतःला आंतरिक आणि बाह्यरित्या तयार करतो जेणेकरून, जसे ख्रिस्त आपल्यासारखा बनला तसेच आपणही त्याच्यासारखे बनू शकू. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताप्रती आपल्या वचनबद्धतेचे नूतनीकरण करण्याचे हे आमंत्रण आहे - आपल्या जीवनात संतुलन साधून, शांती आणि पवित्रता कायम ठेवीण्याची वेळ आहे.

बऱ्याचदा, आपण उपवासाला फक्त अन्न वर्ज्य मानतो. परंतु संत जॉन क्रिसोस्टम आपल्याला चेतावणी देतात की "ज्याला असे वाटते की उपवास म्हणजे जेवन न करणे होय, तर हे चुकीचे आहे; तर खरा उपवास म्हणजे वाईटापासून दूर राहणे होय." म्हणून, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अन्नापासून उपवास करताना, आपल्याला पाप, गप्पागोष्टी, मत्सर, राग आणि त्या गोष्टींपासून उपवास करण्याचे आव्हान देखील दिले जाते ज्यांना आपण नेहमी आपल्यावर नियंत्रण ठेवू देतो.

एक चर्च म्हणून, चर्च कॅलेंडर आणि त्याच्या विविध सणांमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन ख्रिस्ताचे एक शरीर म्हणून जगण्यासाठी या सर्व संधींचा उपयोग करून घेऊया. हे नवीन धार्मिक वर्ष कृतीसाठी, चर्चच्या भिंतीं पलीकडे जाण्यासाठी, पॅरिशसाठी मिशमध्ये भरभराट होण्याकरीता आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्तासारखे होण्यासाठी एक आवाहन असू द्या!

सर्वशक्तिमान देवाची शांती आणि कृपा सदैव तुमच्या सोबत राहो.

ख्रिस्तामध्ये तुमचा पिता



अथेनेशियस योहान प्रथम मेट्रोपॉलिटन

**तारीख:** 20 नोव्हेंबर 2023

**स्थान:** पवित्र सिनड